## प्रकरण सहावे

## गोषवारा

### ६.१ नागरी बँका :

६.१.१ भारतात नागरी सहकारी बँकांची सुरुवात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. भारतात १९०४ च्या सहकार कायद्याने सहकार चळवळीची मुहुर्तमेढ रोवली. रमणलाल सरैया यांच्या अध्यक्षतेखालील सहकार नियोजन समितीनेही या बँकांबाबत चांगला अभिप्राय दिला.

६.१.२ सध्या नागरी बँका आपल्या उपविधीनुसार तालुका, जिल्हा किंवा राज्याबाहेर शाखा उघडू शकतात. अलिकडे नागरी बँकांना व्यापारी बँकांबरोबर स्पर्धा करावी लागत आहे.

६.१.३ १९४९ च्या सहकार कायद्यानुसार १९६६ पासून देशातील नागरी सहकारी बँका आणि पगारी नोकरांच्या सहकारी संस्था यांचा एकत्रितपणे "प्राथमिक सहकारी बँका" असा उल्लेख केला जातो.

६.१.४ ३० जून, १९९० अखेरची बँकांची राज्यनिहाय विभागणी पाहिल्यास प्रादेशिक विषमता दिसून येते.

६.१.५ महाराष्ट्र राज्याच्या बँकिंग क्षेत्राच्या विस्तारात महत्त्वाचा भाग म्हणजे नागरी सहकारी बँकांचा झालेला विस्तार होय.

६.१.६ महाराष्ट्रात नागरी सहकारी बँकांचे जाळे पश्चिम महाराष्ट्रातच मोठ्या प्रमाणात पसरले आहे.

६.१.७ पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा हा सहकार चळवळीमधील अग्रेसर जिल्हा आहे.

६.१.८ पगारदार कर्मचा-यांच्या पतसंस्था वाढत आहेत. अर्थात त्यांचे कांही दोषही आहेत.

६.२ <u>रयत सेवक सहकारी बँकेची निर्मिती आणि विकास :</u>

६.२.१ <u>रयत शिक्षण संस्थेची स्थापना आणि विस्तार -</u>

रयत शिक्षण संस्थेची स्थापना सन १९१९ मध्ये काले, ता.कराड येथे झाली. संस्थेच्या विस्ताराबाबत पुढील मुद्दे विचारात घेतलेले आहेत.

१) वसतिगृहे
२) शिक्षकांचे प्रशिक्षण
३) प्राथमिक शिक्षण
४) माध्यमिक शिक्षण
५) उच्च माध्यमिक शिक्षण
६) उच्च शिक्षण
७) तांत्रिक शिक्षण
८) स्त्री शिक्षण
९) पूर्व प्राथमिक शिक्षण
१०) सहकारी तत्त्वावर चालविलेल्या संस्था
११) शाखा प्रकारानुसार सेवक माहिती.

६.२.२ <u>रयत सेवक सहकारी बँकेची निर्मिती -</u>

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक तसेच दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि. सातारा या बँकेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यानी रयत

शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या आर्थिक अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने तसेच ठेवींच्या स्पाने आर्थिक बचत करून रयत शिक्षण संस्थेतील सेवक स्वावलंबी व्हावा या दृष्टीने दिनांक १६ ऑगस्ट, १९४० रोजी "दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. सातारा" ही सहकारी पतसंस्था स्थापन केली. सदर सोसायटीचे दिनांक २१ ऑक्टोबर, १९६९ रोजी बँकेत स्पांतर झाले. प्रस्तुत अभ्यासात प्रथमत: रयत सेवक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. सातारा"च्यां स्थापनेपासूनची ते बँकेत स्पांतर होईपर्यंतची, म्हणजे १९४०-४१ ते १९६८-६९ या काळातील, प्रगतीची आकडेवारी देऊन तीचा आढावा घेतला आहे.

६.३ <u>रयत सेवक सहकारी बँकेची आर्थिक बैठक :</u>

६.३.१ बँकेने भागांची विक्री करीत असताना केवळ आर्थिक हेतू डोळ्या-समोर ठेवून भाग भांडवलाची विक्री केली. प्रारंभी जरी थोडासा कमी प्रतिसाद मिळाला असला तरी यथावकाश बँकेने भागांची वेगाने विक्री वाढविली. मात्र त्याबरोबर भांडवल वसुलीही योग्य प्रकारे केली. अधिकृत भांडवल मर्यादा वाढविताना बँकेने आपले स्वत:चे आर्थिक सिंहावलोकन करण्याची पध्दती ठेवली होती.

६.३.२ सभासद संख्या वाढवीत असताना बँकेने आर्थिक हेतू आणि हित डोळ्यासमोर ठेवले. १९९२ साली रयत शिक्षण संस्थेतील सेवक संख या १४,७३५ होती. तर बँक सभासद संख्या १२,५६३ होती. म्हणजे ८५.२६ टक्के सेवक बँकेचे सभासद झाले होते. अर्थात सभासद संख्या १०० टक्के न होण्याचे कारण असे की, संस्था प्रत्येक वर्षी नोकर भरती करीत असते. आणि बँक सेवकाची संस्थेत सलग दोन वर्षे सेवा झाल्याखेरीज सभासदत्व देत नाही.

६.३.३ खेळत्या भाग भांडवलाबाबत बँकेची प्रगती समाधानकारक अशीच आहे.

६.३.४ बँकेकडे रयत शिक्षण संस्थेच्या आणि सेवकांच्या ठेवी असतात. बँकेने विविध प्रकारच्या आकर्षक ठेव योजना सुरू करून ठेवींमध्ये वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

६.३.५ बँकेने चालू ठेवींपेक्षा मुदत ठेवी आणि बचत ठेवी वाढविलेल्या आहेत. बँकेच्या एकूण ठेवींमध्ये भविष्यनिर्वाह निधी आवर्ती ठेवींची टक्केवारी सर्वाधिक आहे.

६.३.६ बँकेचे आर्थिक स्थैर्य भक्कम असल्याने अन्य वित्तीय संस्थाकडून अनावश्यक कर्जे घेतली नाहीत. जी काही थोडी घेतली ती मुदतीत परत करून काहीही थकबाकी ठेवली नाही. त्यामुळे बँकेने आर्थिक पत राखली आहे.

६.३.७ बँकेने १९८३-८४ या वर्षात अहमदनगर, पुणे व सांगली या तीन ठिकाणी एकाच वेळी शाखा स्थापन केल्या. बँकेच्या आर्थिक व्यवहारात शाखा स्वयंपूर्ण राहतील अशा रितीने शाखांचे नियंत्रण केले.

## ६.४ बँकेचे कर्ज आणि गुंतवणूक व्यवहार :

६.४.१ बँकेने विविध प्रकारच्या कर्ज योजना राबवून कर्ज विस्तार केला.

६.४.२ बँक फक्त सभासदांना आणि रयत शिक्षण संस्थेला तसेच तिच्या शैक्षणिक शाखांना कर्जे देते. बँकेने सुरुवातीपासूनच दीर्घकालीन कर्जपुरवठा मोठ्या प्रमाणात केला आहे.

६.४.३. रयत सेवक सहकारी बँकेची थकबाकी तसेच एकूण कर्जाशी थक-बाकीचे असणारे प्रमाण अगदीच कमी आहे. कर्जाची वसुली परस्पर पगारातून होत असल्याने थकबाकी अत्यल्प आहे.

६.४.४ गुंतवणूक करताना रोखतेला प्राधान्य दिले. आपली आर्थिक कुवत लक्षात घेऊन गुंतवणूक संरचनेत बदल केला गेला.

६.५ <u>आर्थिक स्थैर्य :</u>

६.५.१ बँकेने आपल्या खर्चावर सुरुवातीपासूनच नियंत्रण ठेवलेले आहे. खर्चाचा ढाचा आणि स्वरूप यामध्ये विशेष बदल केलेले नाहीत.

६.५.२ बँकेने उत्पन्न मिळविण्यात कौशल्य दाखविले आहे. मात्र उत्पन्ना-साठी आपल्या रोखतेकडे दुर्लक्ष केले नाही.

६.५.३ बँकेने उत्पन्नाप्रमाणेच स्थूल नफाही सातत्याने मिळविलेला आहे. बँकेच्या स्थूल नफ्यात व्यवस्थापकीय खर्चाचे असणारे प्रमाण मर्यादित आहे. त्यामुळे निव्वळ नफा मिळविण्यात बँकेला यश आले आहे.

६.५.४ नफ्यातून प्रतिवर्षी पुरेसा पैसा राखीव निधीकडे वर्ग केल्याने बँकेकडे असा निधी मोठ्या प्रमाणात जमा झाल्याने बँकेची आर्थिक स्थिती मजबूत होऊ शकली.

६.५.५ गुंतवणूक करताना रोखतेकडे लक्ष देऊन नफ्याकडेही दुर्लक्ष केलेले नाही.

रयत सेवक सहकारी बँकेच्या कार्याचा एकंदरीत विचार केला तर या बँकेची भांडवल उभारणी, ठेवींचे संकलन, कर्जाचे व्यवहार, कर्जाची संरचना, खर्च, उत्पन्न, नफा वगैरे दृष्टिकोनातून बँकेने समाधानकारकरित्या वाटचाल केली आहे. सातत्याने नफ्यात चालणारी, सहकाराच्या तत्वांचा आदर

राखून व्यवहार करणारी, ठेवीदार, कर्जदार आणि भाग भांडवलदार या सर्वांचे हितसंबंध जपणारी अशी ही बँक आहे. थोडक्यात, बँकेच्या आर्थिक वाढीचा दर वाढता राहिला हेच बँकेच्या यशाचे महत्त्वाचे निर्देशक आहे. म्हणून "रयत सेवक सहकारी बँकेचे कामकाज समाधानकारक आहे" या परि- कल्पनेला सर्व निष्कर्षांमधून पुष्टी मिळते.

## ६.६ काही सूचना :

रयत सेवक सहकारी बँकेच्या संशोधन अध्ययनातून या बँकेला काही सूचना कराव्याशा वाटतात, त्या खालील प्रमाणे आहेत.

१) रयत शिक्षण संस्थेतील सेवकांची संख्या पाहता बँकेने आपल्या ठेवी अजून वाढविल्या पाहिजेत.

२) काही ठेव योजना सक्तीच्या कराव्यात. त्यामुळे सभासदांची बचत वाढेल आणि त्याबरोबरच बँकेची आर्थिक स्थिती आणखी मजबूत होईल.

३) बँकेने रयत शिक्षण संस्थेतील गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करावी.

४) संस्थेतील मुलामुलींच्या वसतिगृहांना, वसतिगृह सुधारणांसाठी आर्थिक मदत करावी.

५) बँकेने सातारा, पुणे, अहमदनगर येथील संस्थेच्या महाविद्यालयातील गरीब, होतकरू, वसतिगृहात राहणारे तसेच कमवा व शिका योजनेत काम करणारे जे विद्यार्थी आहेत त्यांना प्रतिवर्षी विशिष्ट काळात बँकेच्या कामकाजात सामावून घ्यावे. त्यामुळे विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्राचे व्यावहारिक ज्ञान आत्मसात करता येईल.

६) प्रत्येक वर्षी सहकार सप्ताहात सहकार मेळावा, प्रदर्शन आणि व्याख्याने आयोजित करावीत.

७) बँकेने जास्तीत जास्त कर्मचा-यांनाप्र प्रशिक्षणासाठी पाठविले पाहिजे.

८) बँकेचे मुख्य कार्यालय आणि शाखा यांच्या स्वत:च्या मालकीची इमारत पाहिजे.

९) रयत शिक्षण संस्थेचा विस्तार पाहता बँकेच्या तीन शाखा कमी आहेत. बँकेने सभासदांच्या सोयीसाठी शाखा विस्तार केला पाहिजे.

१०) कर्ज व्यवहाराबाबत काही सुचना आहेत त्या पुढील प्रमाणे -

अ) "साधे कर्ज" मर्यादा ४०,०००/- रुपयांवरून ५०,०००/- रुपये करावी.

आ) "तातडीचे कर्ज" मर्यादा २,०००/- रुपये आहे ती ५,०००/- रुपये करावी.

इ) "हप्ते बंद खरेदी कर्ज" देणे बँकेने बंद केलेले आहे. ते देण्यास सुरुवात करावी आणि त्याची मर्यादा १५,०००/-- रुपये ठेवावी.

ई) सोने तारण कर्ज योजना बँकेने सुरु करावी.

थोडक्यात, रयत सेवक सहकारी बँकेचे भूतकालीन कार्य समाधानकारक आहे, हे निर्विवाद. तथापि त्यावर आत्मसंतुष्ट न राहता बँकेला भविष्यातील उज्ज्वल वाटचालीसाठी काही नव्या वाटा चोखाळणे जरूरीचे आहे.

.....

# ग्रंथसूची

अ) ग्रंथ :


1) Choube B.N., Principles and Practice of Co-operative Banking in India, Asia Publishing House Bombay, 1968.

2) Hajela T.N., Principles, Problems and Practice of Co-operation, Shivlal Agrawal and company, Delhi, 1982.

3) Mamoria C.B., Agricultural Problems of India, Kitab Mahal, Allahabad, 1969.

4) Mathur B.S., Co-operation in India, Sahitya Bhavan, Agra, 1977.

५) कामत, गो.स., सहकार : तत्त्व, व्यवहार व व्यवस्थापन, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, १९७९

६) पाटील, पी.जी., कर्मवीरोपनिषद, ग्रामीण जीवन अभ्यास संस्था, सातारा, १९८९.


आ) नियतकालिके आणि मासिके :


१) अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर, १९९०, खंड १४, अंक २.

२) अर्थसंवाद, ऑक्टोबर-डिसेंबर, १९९०, खंड १४, अंक ३.

3) Urban Credit, September, 1991, Vol, 13, Table 1,2 and 6.

इ) <u>वार्षिक अहवाल आणि इतर :</u>

१) वार्षिक अहवाल, १९६७-६८ ते १९९१-९२, रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, सातारा.

२) कुलकर्णी, ना.श्री., "महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँका : स्वरूप व समस्या", शोधनिबंध, मराठी अर्थशास्त्र परिषद, १४ वे वार्षिक अधिवेशन, सोलापूर, नोव्हेंबर, १९९०.

३) भारताची जनगणना, १९९१, सातारा नगरपरिषद, सातारा.

४) जिल्हा औद्योगिक केंन्द्र, सातारा, कागदपत्रे.

5) Annual Report, 1990-91, National Federation of Urban Co-operative Banks and Credit Societies Ltd., New Delhi.

6) Annual Report of all 19 Banks in Satara.

7) Gazetteer of India, Maharashtra State, (Satara District) Revised Edition, 1963.

8) Issues of Maharashtra Annual, 1935 to 1989, Dastane and Company, Pune.

9) Records of District Statistical Office, Satara.

......